जा.क्र.सिंजिप/राम्रा/असिं/आवि/692/2023
आरोग्य विभाग, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग
सिंधुदुर्गनगरी, दि - 18/12/2023

# संक्षिप्त जाहिरात

## बीएएमएस कंत्राटी अहर्ता धारक वैदयकिय अधिकारी यांची पदभरती

सिंधुदुर्ग जिल्हा सार्वजनिक आरोग्य विभागाअंतर्गत वैदयकिय अधिकारी गट—अ यांचे रिक्तपदी दिनांक ०४/०७/२०१९ चे शासन निर्णयानुसार निव्वळ एम.बी.बी. एस. अहर्ता धारक कंत्राटी किंवा नियमित वैदयकिय अधिकारी मिळेपर्यंत बी. ए. एम. एस. वैदयकिय अधिकारी कंत्राटी पद्धतीने तात्पुरत्या स्वरूपात भरणेकरिता थेट मुलाखत (Walk in interview) दिनांक २६.१२.२०२३ रोजी आयोजित करणेत येत असून याबाबतची सविस्तर जाहिरात सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेच्या wwww.zpsinduhdurg.gov.in या संकेत स्थळावर प्रसिद्ध करणेत येत आहे.

दि.

18/12/23

जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद सिंधुदुर्ग

# सविस्तर जाहिरात

सार्वजनिक आरोग्य विभागाअंतर्गत वैदयकिय अधिकारी गट–अ यांचे रिक्तपदी दिनांक ०४/०७/२०१९ चे शासन निर्णयानुसार निव्वळ एम.बी.बी.एस. अहर्ता धारक कंत्राटी किंवा नियमित वैदयकिय अधिकारी मिळेपर्यंत बी. ए. एम. एस. वैदयकिय अधिकारी कंत्राटी पद्धतीने तात्पुरत्या स्वरूपात भरणेची पदभरती प्रक्रिया मा. जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली निवड समितीमार्फत दिनांक २६.१२.२०२३ रोजी थेट मुलाखत राबविणेत येत आहे.

१) आवश्यक शैक्षणिक अर्हता – मान्यताप्राप्त विदयापीठाची बीएएमएस पदवी/पदव्युत्तर पदवीधारकास प्राधान्य.

२) अनभुव – शासकिय सेवेचा (नियमित किंवा कंत्राटी) अनुभव असल्यास प्राधान्य.

३) मासिक मानधन :— रक्कम रू.४०,०००/—
आदिवासी व दुर्गम भागाकरीता रक्कम रू.४५,०००/—

४) नियुक्ती कालावधी – नियमित अथवा कंत्राटी एम. बी. बी. एस. अर्हता धारक उपलब्ध होईपर्यंत किंवा नियुक्तीच्या दिनांकपासुन ११ महिने कालावधीकरीता यापैकी जे प्रथम घडेल त्या कालावधीकरीता नियुक्ती देणेत येईल.

५) निवड प्रक्रियेकरीता निकष :—

| अनु क्रमांक | मुल्यांकन निकष | १०० गुण | शेरा |
|---|---|---|---|
| १ | बी.ए. एम. एस अंतिम वर्षाचे गुणांकन | ७० गुण | अंतिम वर्षाचे गुणांचे ७० गुणांमध्ये रूपांतरण |
| २ | अतिरीक्त शैक्षणिक अर्हता | १० गुण | पदव्युत्तर पदवी १० गुण |
| ३ | शासकिय/निम शासकिय/ राष्ट्रीय आरोग्य अभियान/बीवीजी/ मोबाईल मेडिकल युनिट इत्यादी पैकी अनुभव | २० गुण | प्रति ६ महिने ३ गुण व एका वर्षाकरीता ६ गुण याप्रमाणे कमाल २० गुण देणेत यावेत. |

७) आवश्यक कागदपत्रांच्या प्रती –

अ) बी. ए. एम. एस. अंतिम वर्षाचे गुणपत्रक

आ) बी. ए. एम. एस. पदवी प्रमाणपत्र

इ) एम. सी. आय. एम. नोंदणीपत्र व नुतनीकरण दाखला.

ई) पदव्युत्तर पदवी असल्यास प्रमाणपत्र

उ) जन्म तारखेचे प्रमाणपत्र

ऊ) अनुभव असल्यास अनुभव प्रमाणपत्र

ए) पासपोर्ट साईज फोटो २

८) निवड प्रक्रिया — अ) सदर भरती प्रक्रियेनंतर वैदयकिय अधिकारी पदे रिक्त राहिल्यास, प्रत्येक महिन्याच्या दिनांक १ व दिनांक १५ रोजी पदे भरेपर्यंत व आवश्यकतेनुसार थेट मुलाखतीव्दारे निवड केली जाईल. सदर दिवशी सुट्टी आल्यास पुढिल कार्यालयीन कामकाजाचे दिवशी थेट मुलाखतीव्दारे निवड प्रक्रिया राबविणेत येईल.

आ) मुलाखतीचे दिवशी सकाळी ११.०० ते दु. १.०० वा. पर्यंत अर्ज स्विकारले जातील. दुपारी १.०० ते २.०० वा. अर्जांची छाननी केली जाईल व दुपारी ३.०० ते ४.०० या वेळेत थेट मुलाखत घेतली जाईल.

इ) मुलाखतीचेच दिवशी जिल्हा परिषद सिंधुदुर्गच्या नोटीस बोर्डवर वा जिल्हा परिषदेच्या अधिकृत संकेतस्थळावर निवड व प्रतिक्षा यादी प्रसिद्ध केली जाईल.

ई) सदर निवड प्रक्रियेच्या निकषात, तारखेमध्ये व इतर बाबींमध्ये बदल करणेचे सर्व अधिकार मा. अध्यक्ष निवड समिती तथा जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांचे राहतील.

उ) सदरची नियुक्ती ही तात्पुरत्या स्वरूपात ठोक मानधनावर असून उमेदवारांस नियमित किंवा कायम शासकिय सेवाचा दावा करता येणार नाही.

ऊ) निवड झाल्यानंतर उमेदवारास रक्कम रू. १००/— च्या बॉण्डवर शासनाने निश्चित केलेल्या अटी व शर्ती मान्य असलेबाबत हमीपत्र सादर करावे लागेल.

13/12/23

जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद सिंधुदुर्ग